महानिर्मिती

# सृजन

फेब्रुवारी - २००९

महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित

वर्ष ४- अंक ७

संवाद



श्री.सुब्रत रथो
(व्यवस्थापकीय संचालक)

## संवाद

महाराष्ट्रासारख्या प्रगत राज्यातील वीजक्षेत्रात अग्रेसर असलेल्या महानिर्मिती - महापारेषण - महावितरण या तिन्ही कंपन्यांशी गेल्या सुमारे पावणेतीन वर्षांपासून मी निगडीत आहे. या काळात एमएसईबी होल्डिंग कंपनी तसेच महापारेषणच्या व्यवस्थापकीय संचालकपदाची जबाबदारी माझेवर असल्याने आणि नंतरचा कालावधी राज्याचा उर्जासचिव म्हणून मी कार्यरत असल्याने या तिन्ही कंपन्यांनी गेल्या साडेतीन वर्षात बजावलेली कामगिरी, त्या कामगिरीतील प्रगतीचा चढता आलेख मी अतिशय जवळून बघितला आहे. आता महानिर्मितीच्या व्यवस्थापकीय संचालकपदाची सुत्रे स्वीकारताना मी या विद्युत परिवाराशीच पुन्हा नव्याने जोडला गेलो असल्याने मनात नवखेपणाची कोणतीही भावना नाही.

महानिर्मितीचे वेगाने पूर्णत्वाकडे निघालेले नवीन वीजनिर्मिती प्रकल्प हे आपले प्रामुख्याने बलस्थान आहे. प्रकल्प उभारणीच्या कामात किती नानाविविध अडथळे येतात याची मला कल्पना आहे. परंतु या सर्व अडथळयांवर मात करून आपल्याला आपल्या स्थापित क्षमतेत झपाटयाने वाढ करायची आहे. हे सर्व नवीन प्रकल्प उभारले जात असताना उपलब्ध अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा जास्तीतजास्त वापर कसा करून घेता येईल याचा विचार केला पाहिजे. नवीन प्रकल्पांच्या कामाचा दर्जा हा इतका उच्च असला पाहिजे की, आगामी काळात त्यात कोणताही तांत्रिक बिघाड उद्‌भवू नये व क्षमतेनुरूप वीजनिर्मिती त्यातून शक्य झाली पाहिजे. खरेतर आपले नवे प्रकल्प म्हणजे वीजग्राहकांची 'उद्याची सोय' आहे; परंतु वीजग्राहकांच्या वाढत्या अपेक्षा लक्षात घेता त्यांची 'आजची सोय' करण्यासाठी आपल्याला सद्य:स्थितीतील कार्यरत संचांची उपलब्धता, कार्यक्षमता - भारक्षमता - भारांक या सर्व बाबींच्या अनुषंगाने महत्तम कामगिरी बजावावी लागेल. नुकतेच ऊर्जा क्षेत्रातील राष्ट्रीय पुरस्कार घोषित झाले आहेत. त्यात महानिर्मितीचा समावेश नाही. परंतु आम्ही उच्चतम कामगिरी केल्यास उर्जानिर्मिती क्षेत्रातील राष्ट्रीय स्तराच्या पुरस्कारांवर आपल्याला पुन:श्च हक्क सांगता येईल हे निश्चित.

पुरस्कार हे निमित्तमात्र असतात. परंतु त्या निमित्ताने सर्वोत्तम कामगिरीसाठी आपण सर्व उद्युक्त होत असतो हे महत्वाचे. या सर्वोत्तम कामगिरीसाठी आपण सर्वांनी नेहमीच प्रयत्नशील राहिले पाहिजे असे आवाहन आपणा सर्वांना मी कंपनीची सुत्रे स्वीकारत असताना करतो. शिवाय कामगिरी कितीही उत्तम असली तरीही जोपर्यंत त्यात सातत्याचा अभाव असतो तोपर्यंत ती यशामध्ये परिवर्तित होत नसते. सर्वांनी या यशामध्ये सहभागी होण्यासाठी आपल्या कामातील सहभाग देणे आवश्यक आहे.

कार्पोरेट क्षेत्रातील कामाचा दर्जा - गतीमानता आणि सार्वजनिक उपक्रमातील सामाजिक उत्तरदायित्वाची जाणीव यांची सुयोग्य सांगड घालून आपण एक आदर्शवत कार्यसंस्कृती रुजविण्याचा सतत प्रयत्न केला पाहिजे असे मला वाटते.

या महिन्याच्या प्रारंभीच्या आठवडयात चंद्रपूर येथील ५०० मेगावॅट संचासाठीच्या कोळसा हाताळणी विभागात काही समस्या निर्माण झाली होती. कंत्राटी कामगारांच्या असहकारामुळे या विभागाच्या संचलन व्यवस्थेत काही त्रुटी उद्‌भवल्या होत्या. अखंड वीजनिर्मितीत कोणत्याही तांत्रिक वा अतांत्रिक कारणांमुळे कोणताही व्यत्यय येऊ नये यासाठी, तसेच अशा घटनांची पुनरावृत्ती कोठेही होणार नाही यासाठी स्थानिक पातळीवरील वरिष्ठ व्यवस्थापनाने अधिक सतर्क राहणे जरूरीचे आहे. याउपरही अशा प्रकारची परिस्थिती अचानक उद्‌भवलीच तर ती अधिकाधिक सक्षमतेने हाताळण्यासाठी आपल्या क्षेत्रीय अधिकाऱ्यांनी नेहमीच सज्ज असले पाहिजे. आगामी घटनाक्रमाचा व संभाव्य परिणामांचा पूर्वअंदाज घेऊन योग्य त्या नियोजन आराखडयासह त्यांनी आपले उत्तरदायित्व निभवायला हवे असे मी सूचित करतो.

आता उन्हाळयाला प्रारंभ होणार असून मार्च - एप्रिल या महिन्यांचा कालावधी हा वार्षिक परिक्षांचा महत्वाचा कालावधी असतो. या दृष्टीने हा कालावधी खरेतर आपल्याही 'परिक्षेचा' कालावधी आहे याची जाणीव प्रत्येकाने बाळगून जबाबदारीने काम केले पाहिजे. या कालावधीत आपल्या वीजसंयंत्रांत कोणताही तांत्रिक बिघाड उद्‌भवणार नाही यासाठी सर्वांनी सतर्क राहावे असे मी आवाहन करतो.

महानिर्मितीच्या कर्मचाऱ्यांशी 'सृजन' च्या माध्यमातून हा माझा पहिलाच संवाद असला तरीही या कंपनीत अनुभवी व कुशल अभियंते - तंत्रज्ञ यांची मोठी कुमक आहे याची मला कल्पना आहे. आपली कंपनी एक आदर्श सार्वजनिक उपक्रम म्हणून नावारुपाला आणण्यासाठी या उपलब्ध मनुष्यबळाला जास्तीत जास्त प्रोत्साहित करण्याचा प्रयत्न व्यवस्थापन नक्कीच करेल याची ग्वाही मी आपणास देऊ इच्छितो.

आगामी काळातील आपल्या स्थापित क्षमतेतील वाढ व सेवानिवृत्तीकडे झुकणाऱ्या कर्मचाऱ्यांचे प्रमाण लक्षात घेता कंपनीतील कुशल अनुभवी तंत्रज्ञांनी आता प्रयत्नपूर्वक तंत्रकुशल अभियंते - तंत्रज्ञांची दुसरी फळी आत्तापासूनच निर्माण करणे गरजेचे आहे. मनुष्यबळ विकासाच्या माध्यमातून कर्मचाऱ्यांच्या सर्वांगीण उत्कर्षासाठी व्यवस्थापन सकारात्मक दृष्टीकोन बाळगेल असे मी नमूद करु इच्छितो. आपल्या बहुतांशी विद्युतकेंद्रांना सुसज्ज कर्मचारी वसाहतीची सुविधा उपलब्ध आहे. या वसाहती समाजातील आदर्श समाजातील आदर्श वसाहती म्हणून स्थान मिळवतील यासाठी तिथे अनेकविध सामाजिक- सांस्कृतिक उपक्रम अवश्य राबवण्यात यावेत. जास्तीत जास्त वीजनिर्मिती करताना पर्यावरणाशी आपली बांधिलकी आहे हे या निमित्ताने मी अधोरेखित करतो.

सुब्रत रथो
(व्यवस्थापकीय संचालक)